# ५०० चौरस फुटांची घर मालमत्ता कर मुक्त करा!

## शिवसेनेची विधानसभेत मागणी

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - मुंबई, ठाण्यातील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता करातून सूट देण्याचा ठराव महापालिकेने मंजूर केला. मात्र हा प्रस्वाव राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. शिवसेना-भाजप युतीच्या घोषणेवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घरांना मालमत्ता करातून मुक्त करण्याची घोषणा केली होती. हे अधिवेशन संपण्याआधी मुख्यमंत्र्यांनी याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी शिवसेनेचे प्रतोद सुनील प्रभू यांनी आज केली.

पुरवणी मागण्यांवर बोलताना सुनील प्रभू यांनी मुंबई-ठाण्यातील ५०० चौरस फुटांच्या घरांचा प्रश्न मांडला. या घरांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी याच अधिवेशनात घ्यावा. त्याचप्रमाणे मेट्रोच्या सुविधेसाठी घरांच्या खरेदीवर भरावा लागणारा एक टक्के अधिभार रद्द करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही प्रभू यांनी केली. कुरार व्हिलेज परिसरातील सीसीटीव्ही लावण्यात आल्याने येथील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होत आहे. आणखीही सीसीटीव्ही मंजूर झाले असून तेही लवकरात लवकर लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे आरे कॉलनीमध्ये अनेक प्रकल्पांमुळे येथील झाडांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी वनिकरणाच्या माध्यमातून वृक्ष लागवड करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.

**नाणार जमीन अधिग्रहणाची सूचना रद्द करा**

नाणारमधील रिफायनरीसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनींच्या अधिग्रहणाची सूचना रद्द करण्यात यावी. अधिवेशन संपण्यापूर्वी ही अंमलबजावणी व्हावी. त्याचप्रमाणे नाणार रिफायनरी विरोधात करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान नाणारवासीयांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेतले जावेत. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची कार्यवाहीही वेगाने करण्यात यावी, अशीही मागणी सुनील प्रभू यांनी केली.

**एसआरएतून कोळीवाड्यांना वगळून नव्या धोरणानुसार विकास करा!**

मुंबई शहर व उपनगरात १८९ गावठाणे व ४१ कोळीवाडे अस्तित्वात आहेत. मात्र या कोळीवाड्यांचे अस्तित्व कायम न ठेवता त्यांचा एसआरए योजनेत समावेश करण्यात आला. एसआरएत पुनर्विकास करण्याच्या निर्णयाने कोळी बांधवांवर अन्याय होत आहे. त्यामुळे या कोळीवाड्यांना एसआरएमधून वगळून त्यांचे पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे.

येथील एसआरए प्रकल्प रद्द करून कोळीवाड्यांचा विकास नवीन धोरणानुसार करण्यात यावा, अशी मागणी सुनील प्रभू यांनी केली.

मालमत्ता करात सूट देण्याचे आश्वासन शिवसेनेने महापालिका निवडणुकीत दिले होते.

# मुक्त, शांततापूर्ण, निर्भय वातावरणात लोकसभा निवडणुका पार पाडण्यास वचनबद्ध

## निवडणूक आयुक्त अशोक लवासा यांची ग्वाही

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार- आगामी लोकसभा निवडणुका मुक्त, शांततापूर्ण, निर्भय वातावरणात आणि पारदर्शक तसेच सर्वसमावेशक पद्धतीने पार पाडण्यासाठी वचनबद्ध आहे, अशी ग्वाही केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त अशोक लवासा यांनी दिली.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेला केंद्रीय निवडणूक आयोगाचे निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांच्यासह राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी अश्वनी कुमार, केंद्रीय निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त सुदीप जैन, उप निवडणूक आयुक्त चंद्रभूषण, महासंचालक (व्यय) दिलीप शर्मा उपस्थित होते.

कालपासून दोन दिवस आयोगाने राज्यातील निवडणूक तयारीचा आढावा घेतला. सर्व राष्ट्रीय पक्ष, तसेच राज्यातील मान्यताप्राप्त पक्षांच्या प्रतिनिधींबरोबर बैठका घेऊन त्यांचे म्हणणे जाणून घेतले. याशिवाय मुख्य निवडणूक अधिकारी आणि पोलीस नोडल अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्थेबाबत आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना केल्या. निवडणुकीतील पैशाचा गैरवापराला आळा घालण्याच्या दृष्टीने आयकर विभाग, पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, भारतीय विमानतळ प्राधिकरण (एएआय), परिवहन विभाग, भारतीय पोस्ट आदी विभागांची बैठक घेऊन मार्गदर्शन केले. आज राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. याशिवाय राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या निवडणूक तयारीचा जिल्हानिहाय आढावा निवडणूक प्रशासन व पोलीस प्रशासनाकडून घेण्यात आला.

लवासा म्हणाले, मतदार याद्यांची काटेकोर तपासणी करुन त्या अचूक असतील याची काळजी घेण्यास निवडणूक आयोगाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना मतदार याद्या अचूक असल्याबाबत खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. काही राजकीय पक्षांनी निवडणूक याद्यांविषयी प्रश्न उपस्थित केले होते. त्या अनुषंगाने तपासून कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. दुबार मतदार शोधण्यासाठी आयोगाचे स्वत:चे सॉफ्टवेअर असून कोणत्याही एका व्यक्तीची एकापेक्षा अधिक ठिकाणी नावे असल्यास संबंधिताच्या संमतीने एका ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणची नावे वगळण्यात येतील.

यावेळच्या निवडणुकीत प्रत्येक मतदान केंद्रावर आणि प्रत्येक इव्हीएम मशीनबरोबर व्हीव्हीपॅट यंत्रांचा शंभर टक्के वापर होणार आहे. त्यामुळे मतदार केलेल्या मतदानाची खात्री करु शकेल. याशिवाय व्हीव्हीपॅट यंत्रांमधील चिठ्ठ्यांच्या मोजणीसाठी त्या मतदार संघातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल. राज्यभरात व्हीव्हीपॅट जागृती मोहीम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत ९२ हजार ४२८ मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅट जागृती मोहीम राबविण्यात आली आहे.

## लक्ष्यवेध
**अरविंद भानुशाली**



# महिला आमदारांचा प्रक्षोभ

मंत्री आपापल्या बंगल्यात मस्त आहेत आणि विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना आमदारांची राहण्याची योग्य व्यवस्था नाही, अशा शब्दात मंगळवारी सर्वपक्षीय आमदारांनी विधानसभेत निवास व्यवस्थेसह अन्य गैरसोयींबद्दल नाराजी व्यक्त केली. अधिवेशन कालावधीत आमदारांची राहण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. आज विधानसभेत पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित बाबींवर बोलताना भाजपच्या आमदार मनीषा चौधरी यांनी निवासाच्या गैरसोयीचा मुद्दा मांडला. धोकादायक मनोरा आमदार निवासाची इमारत पाडण्यास सुरूवात झाल्याने आमदारांची गैरसोय होत आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेत मिळून २६ महिला आमदार आहेत. विधानमंडळाने आमची निवासाची गैरसोय दूर करावी यासाठी आम्ही विधानमंडळ सचिवांची भेट घेतली. निवासासाठी हॉटेलचे १८ हजार रूपये भाडे आम्हाला परवडणारे नाही. त्यामुळे महिला आमदारांची प्रधान्याने राहण्याची व्यवस्था करावी अन्यथा सरकारने भाडे द्यावे, अशी मागणी चौधरी यांनी केली. काँग्रेसच्या वीरेंद्र जगताप, शिवसेनेच्या सुभाष साबणे यांनी आकाशवाणी आमदार निवासातील गैरसोयींकडे सरकारचे लक्ष वेधले. मनोरा आमदार निवास इमारत पाडण्यास सुरूवात झाल्याने बहुतांश आमदार, कार्यकर्ते आकाशवाणी आमदार निवासात आले आहेत. एकाच खोलीत चार आमदार राहत आहेत. याशिवाय गावाकडून मंत्रालयात कामानिमित्त येणारे नागरिकांसाठी स्नानासाठी रांगा लागत आहेत, असे साबणे म्हणाले. तर काँग्रेसच्या जयकुमार गोरे यांनी आकाशवाणी आमदार निवासासमोरील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार करत तेथे वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी केली. यावर तालिका अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांकडे बैठक घेऊन मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

**पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याचे पडसाद**

विधिमंडळाच्या अल्पकालीन अधिवेशनाचा मंगळवार हा दुसरा दिवस भारताने पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याचे पडसादच उमटले. विशेष म्हणजे यावेळी राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड यांनी तर राष्ट्रीय झेंडा फडकविला तर समाज पक्षाचे अबू आझमी यांनी पेढे वाटून त्याचे स्वागत केले व विधानसभेत आज प्रारंभी पाकिस्तानवर हल्ला करणाऱ्या जवानांचे अभिनंदन करण्याचा प्रस्तावच मंजूर करण्यात आला. मंगळवारी दिवसभर पाकिस्तानवरील हल्ल्या संदर्भातच विधिमंडळात आवारात चर्चा सुरू होती. या हल्ल्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजप व सेनेचे जागा वाढणार अशी कबुली काँग्रेस-राष्ट्रवादी दिग्गज नेते देत होते. विशेष म्हणजे नरेंद्र मोदी यांची ५६ इंच छाती गेली कुठे असे म्हणारे शिवसेनेचे नेतेही मोदींनी ५६ इंच छाती दाखविल्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले.

**मंत्र्यांच्या उत्तरा अगोदरच पुरवणी मागण्या मंजूर...**

विधान सभेत पुरवणी मागण्याच्या चर्चेवर संबंधित मंत्र्यांची उत्तरे येण्यापूर्वी तालिका अध्यक्षांनी पुरवणी मागण्या मंजूर केल्याचे जाहिर करून आश्चर्याचा धक्का दिला.

# बॉम्बची अफवा पसरविणाऱ्या तरुणाला अटक

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - बॉम्बची अफवा पसरविणाऱ्या बिवीन कोठारी नावाच्या एका तरुणाला काल अंधेरी पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला अंधेरीतील स्थानिक महानगर दंडाधिकारी न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत पाठविले आहे. त्याच्याविरुद्ध पोलिसांनी आरोपपत्र सादर केल्याचे पोलिसांनी सांगितले. अंधेरीतील सहार रोडवरील कोलडोंगरी परिसरात एक पॉश सोसायटी आहे. या सोसायटीसमोरच सोमवारी दुपारी साडेतीन वाजता बिपीन हा जोरजोरात आरडाओरड करीत होता, यावेळी त्याला सोसायटीच्या काही रहिवाशांनी शांत राहण्यास सांगितले, मात्र त्याचा आरडाओरड सुरु होता, यावेळी त्याने त्यांच्या सोसायटीमध्ये बॉम्ब असल्याचे सांगितले. बॉम्ब शब्द ऐकताच तिथे उपस्थित रहिवाशांमध्ये एकच खळबळ उडाली होती.

# धनगर प्रश्नावरून विधान परिषदेत हल्लाबोल

## दिवसभरासाठी कामकाज तहकूब

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार- भाजपच्या मनात असत तर २०१६ मध्येच लोकसभेत ३२५ क्रमांकाचे विधेयक आले असते. त्यावेळी धनगर आरक्षण मंजूर करून घेतलं असत परंतु धनगर समाजाला आरक्षण द्यायचंच नव्हतं केवळ निवडणुकीसाठी गाजरं दाखवण्याचं काम भाजपने केल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी सभागृहात केला. दरम्यान आज या प्रश्नावर विरोधकांनी हल्लाबोल केल्याने सभापती रामराजे निंबाळकर यांनी दिवसभरासाठी कामकाज तहकूब केले.

धनगर समाज आरक्षणाचा प्रश्न औचित्याच्या मुद्याद्वारे धनंजय मुंडे यांनी सभागृहात उपस्थित केला. यावेळी सरकारच्या आश्वासनावर जोरदार हल्लाबोल केला. मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीपूर्वी धनगर समाजाला पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देण्याचे जाहिर आश्वासन दिले होते. त्याची आठवण धनंजय मुंडे यांनी सभागृहात मुख्यमंत्र्यांना करून दिली.

आता साडे चार वर्ष उलटून गेली, शेकडो कॅबिनेट झाल्या परंतु मुख्यमंत्र्यांनी धनगर समाजाला दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही.

२०१६ मध्ये लोकसभेत ३२५ क्रमांकाचे विधेयक आले होते. त्या विधेयकाला राज्यातील १८ खासदारांनी धनगर अशी दुरुस्ती करावी सुचवली होती, असेही मुंडे यांनी सांगितले.

केंद्र सरकारने कलम ३४२ अंतर्गत निर्गमित केलेले आदिवासींच्या यादीत बदल करावा, धनगड ऐवजी धनगर अशी दुरुस्ती करावी अशाप्रकारची शिफारस सभागृहाने करावी आणि याप्रकरणाच्या ठरावही घ्यावा अशी मागणी मुंडे यांनी केली.

राज्य सरकारला धनगर समाजाला आरक्षण देता येत नसेल तर त्यांनी एक सर्वपक्षीय ठराव मांडावा, तो एकमताने पारीत करून केंद्राकडे पाठवावा, २०१४ साली देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला अनुसुचित जमातींच्या सवलती देण्याचे आश्वासन दिले होते, पण अद्याप सवलती दिल्या गेल्या नाही. राज्याचे महाधिवक्ता टिसच्या अहवालाचा अभ्यास करत आहे. अभ्यास झाला की आरक्षण देऊ अशी गाजर दाखवली जात आहेत, असे मुंडे म्हणाले.

धनगर आरक्षणाबाबत आमदार रामदास वडकुते, आमदार रामहरी रुपनवर यांनीही हा विषय उचलून धरला. त्यावेळी सभागृहात सरकारकडून योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे सभागृहात एकच गोंधल उडाला.

TATA

**TATA STEEL LIMITED**
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि बीएसई लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध केलेल्या परपेच्युअल हायब्रिड सिक्युरिटीजवरील डिस्ट्रीब्युशन खालील प्रकारे देय आहे.

| अनु. क्र. | परपेच्युअल हायब्रिड सिक्युरिटीज (पीएचएस) | डिस्ट्रीब्युशन रोजी नियत | डिस्ट्रीब्युशन प्रदानासाठी रेकॉर्ड डेट |
|---|---|---|---|
| १ | एकूण रु. १,५०० कोटींची १८ मार्च, २०११ रोजी वाटप केलेली ११.८०% पीएचएस (ISIN:INE081A08165) | १८ मार्च, २०१९ | १२ मार्च, २०१९ |

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**पार्वथीसम के.**
कंपनी सेक्रेटरी आणि
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट ॲण्ड कॉम्प्लायन्स)

२५ फेब्रुवारी, २०१९
मुंबई

TATA STEEL

# चैतन्य साधना



डॉ. मनीषा शेटे

## स्वातंत्र्याचा अर्थ

स्वातंत्र्य या शब्दाला अनेक आयाम आहेत. आपण स्वतंत्र आहोत हे नक्की कधी म्हणायचे आणि आपण खरंच स्वतंत्र आहोत का याविषयी प्रश्न कधी विचारायचे हे एक अवघड काम आहे. स्वातंत्र्य म्हंटले कि ते व्यक्तिगत स्वातंत्र्य, समूहाचे स्वातंत्र्य, देशाचे स्वातंत्र्य असे कितीतरी विस्तारत जाते. स्वच्छंद उडणारे पक्षी, पाहिजे तिथे उगवणारी झाडे, मनासारखे वाहणारे पाण्याचे प्रवाह हे खरतर मुक्ततेचे प्रतीक. खऱ्या अर्थाने स्वतंत्र. माणूस या अर्थाने स्वतंत्र असतो का? हा एक गहन प्रश्न आहे. स्वातंत्र्याची आपली परिभाषा बरीचशी मर्यादित असते. म्हणजे बहुतेक जण मी स्वतंत्र आहे हे कशाच्या आधाराने ठरवितात तर मी मला पाहिजे तेव्हा कुठेही जाऊ शकतो किंवा शकते, माझ्या आवडीचे कपडे घालू शकतो किंवा शकते, आवडीचे खाऊ-पिऊ शकतो , अभ्यास करू शकतो इत्यादी इत्यादी. हे सगळे आपण स्वतंत्र आहोत हे दर्शविणारी बाह्य चिन्हे आहेत.

स्वातंत्र्य या शब्दाला काहीजण लगेच स्वैराचार असाही शब्द जोडतात. विशेष करून चौकटीबाहेर विचार करणाऱ्या, वागणाऱ्या व्यक्तींना अशी उपाधी लावली जाते. स्त्री-पुरुष यांच्या मधील स्वातंत्र्याच्या कल्पनाही फारच वेगळ्या प्रकारच्या असतात. मुळात अनेक स्त्रियांना स्वातंत्र्य म्हणजे काय हेही कळू नये अशी व्यवस्था दुर्दैवाने समाजात असते. त्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्याच्या कल्पना इतक्या संकुचित होतात की आपण अनेक गोष्टी करण्यासाठी इतरांवर अवलंबून आहोत हेही त्यांना लक्षात येत नाही. पुरुषांच्या बाबतीत काही बदल असतात पण तेही कदाचित बाह्य स्वातंत्र्य असते.बाह्य स्वातंत्र्यापेक्षा विचारांचे स्वातंत्र्य जास्त महत्वाचे आहे. स्वतःचे निर्णय स्वतः घेता येणे, ते योग्य रीतीने प्रत्यक्षात आणणे. त्यातून कोणाचेही नुकसान होत नाही ना याची पडताळणी करता येणे महत्वाचे असते. स्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पनेतून बऱ्याच वेळा दुसऱ्यांवर, त्यांच्या विचारांवर आपण अतिक्रमण करत असतो. बऱ्याच स्वातंत्र्यप्रेमी लोकांना हे लक्षातही येत नाही की स्वतःच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांमुळे ते इतरांवर अन्याय करत आहेत. जी व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यप्रेमी असते ती निश्चितच दुसऱ्यांच्या ही स्वातंत्र्याचा आदर ठेवणारी असते. एरवी स्वातंत्र्य म्हणजे मृगजळ असेच अनेकांना वाटू शकते. मनाच्या व विचारांच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या धारणा स्पष्ट असण्याचा नक्कीच उपयोग होतो. मला काय करायचे आहे हे ज्यांना निश्चित कळते त्यांना स्वातंत्र्याचा अर्थही स्पष्ट होतो. निर्भय व निरहंकारी व्यक्तीच खऱ्या अर्थाने स्वतंत्र असू शकते.

तुम्हाला स्वातंत्र्य हवे असेल तर दुसऱ्यांना बंधनात राखणे सोडून द्या. दुसऱ्यांवर वर्चस्व गाजविण्याची तुमची वृत्ती असेल तर तुम्ही स्वतः ही कधीच स्वतंत्र असू शकणार नाही. तुमच्या मनातील विकारांवर विजय मिळविता आला तरच तुम्ही खरे स्वतंत्र असाल.मुक्त पक्षाप्रमाणे,ध्यानस्थ वृक्षाप्रमाणे व वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे.

**क्रमशः**

# रवींद्र सिंघल यांची औरंगाबादला बदली

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच राज्य सरकारने पोलिस दलात मोठे बदल केले आहेत. २७ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश काढले आहेत. त्यात २० आयपीएस अधिकारी व ८ मपोसे अधिकाऱ्यांचा समावेश आहे. नाशिक पोलिस आयुक्तपदी विश्वास नांगरे पाटील यांची नियुक्ती झाली.

नाशिक पोलिस आयुक्त रविंद्र सिंगल यांची बदली विशेष पोलिस महानिरीक्षक म्हणून औरंगाबाद येथे बदली केली.

पी. पी. मुत्याल - विशेष पोलिस महानिरीक्षक नांदेड येथे, फत्तेसिंग पाटील यांची नांदेडहून पुणे गुन्हे अन्वेषण विभागात बदली करण्यात आली आहे. तर पुण्याचे सुनिल रामानंद यांची बदली राज्य सुरक्षा महामंडळाच्या पोलीस महानिरीक्षक म्हणून बदली झाली. अब्दुल रहेमान यांची बदली राज्य मानवी हक्क आयोगाकडे करण्यात आली आहे. दत्त कराळे यांची बदली अप्पर पोलिस आयुक्त ठाणे, प्रताप दिघावकर यांची बदली महिला अत्याचार प्रतिबंधक मुंबई येथे करण्यात आली आहे.

# शिवसेना प्रमुखांच्या स्मारकासाठी ८७ कोटींची निविदा

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार - शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी एमएमआरडीएने ८७ कोटी ४६ लाख रूपयांची निविदा काढली असून शिवाजी पार्क परिसरात स्व. बाळासाहेब ठाकरेचे स्मारक उभारण्यात येणार आहे.

हे स्मारक जागतिक दर्जाच्या गुणवत्तेनुसार असावे यासाठी एमएमआरडीयने विशेष लक्ष दिले आहे. हे स्मारक मुंबईच्या महापौर बंगल्यात उभारण्यात येणार असून काही दिवसांपूर्वी त्याचे भूमिपूजन केले होते.

राज्य सरकारने या स्मारकाचे काम एमएमआरडीकडे सोपविले असून त्यांनी निविदा काढली. ही निविदा ८६ कोटी १४ लाख ६१३ रुपयांची आहे.

# साकिनाका येथे तरुणाची फसवणुक करणाऱ्या टोळीविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**

मुंबई, मंगळवार- साकीनाका येथे एका तरुणाची फसवणूक केल्याप्रकरणी एका टोळीविरुद्ध साकिनाका पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

हनी ट्रपद्वारे फसवणुक करणारी ही टोळी कार्यरत असल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे. तक्रारदार हा मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवाशी असून सध्या तो त्याच्या कुटुंबियांसोबत साकिनाका परिसरात राहतो. हिरे पॉलिश करण्याचे काम करणाऱ्या या तरुणाला जानेवारीत एका महिलेने कॉल केला होता. यावेळी तिने एका फ्रेडशीप क्लबची माहिती दिली होती. या क्लबद्वारे ज्या महिलांना त्यांच्या पतीकडून शारीरिक सुख मिळत नाही, अशा महिलांकडे त्यांना पाठविले जाते, याकामी त्यांना एका व्हिझीटमागे एक ठराविक रक्कम दिली जाते. महिन्यांत असे तीन ते चार व्हिझीट देऊन संबंधित महिलांना शारीरिक सुख दिल्यास त्यांना चांगला फायदा होईल असे सांगण्यात आले होते. क्लबमध्ये सभासद होण्यासाठी दोन हजार रुपये जमा करावे लागतील असे त्याला सांगण्यात आले. त्यानंतर संबंधित महिलेसोबत मिटींग घेण्यासाठी दहा हजार रुपये भरावे लागेल असे सांगून पैसे भरण्यास प्रवृत्त केले. ती भरल्यानंतर त्याला पुन्हा महिलेने फोन करुन महिला त्याला कुठेही रस्त्यावर भेटणार नाही. त्यासाठी त्याला तिला एका हॉटेलमध्ये भेटावे लागेल. हॉटेल बुक करण्यासाठी त्याला पुन्हा ३६ हजार रुपये भरण्यास सांगितले. त्यानेही ती रक्कम जमा केली. त्यानंतर त्याला मेडीकल रिपोर्ट काढावा लागेल. तो रिपोर्ट पाहिल्यानंतर ही महिला तुम्हाला हॉटेलमध्ये भेटेल असे सांगितले. त्यानंतर त्याने या महिलेशी मैत्री करुन तिच्याशी संबंध निर्माण करावे.

## मुंबईचे तापमान

| | |
|---|---|
| कमाल | : ३३.00 अं.से. |
| किमान | : २१.00 अं.से. |

## शेअर बाजार

सेन्सेक्स : ३५१७३ (-२३९.६७)

निफ्टी :१०८३५ (-४४.८०)

| सोने | चांदी |
|---|---|
| ₹ ३३४०० (१० ग्रॅम) | ₹ ४००९५ (१ किलो) |

## पॉवरलाईन

संजय मिस्त्री




त्यांच्या आजूबाजूने वाहने चालविणाऱ्यांना सांभाळून चालवावी लागतात. कारण ते केव्हाही आणि कुठेही युटर्न घेतात!

# भांडुपला आज श्रीरामदास नवमी उत्सव

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी)-श्री समर्थ सद्गुरू खेडेकरबाबा समाधी मंदिर - भांडुप(प).उद्या श्रीदासनवमी उत्सव साजरा होणार आहे. या सोहळ्यात काकड आरती, पादुका पूजन, श्री मनाचे श्लोक,करुणाष्टके यांचे पठण, दासबोध वाचन प्रवचन ,भजन,आरती,महाप्रसाद यांचा सर्वांनी लाभ घ्यावा.

THE FREE PRESS JOURNAL
in association with
SBI General INSURANCE
Presents

**Health Insurance: Right Diagnosis? Right Prescription?**

Keynote Address by
**Shri Eknath Shinde**
Health Minister - Govt. of Maharashtra

Discussions on
- **Health Insurance: Opportunities & Challanges**
- **Ayushman Bharat: Panacea for all ills?**

Expert Views from (In alphabetic order)

- **Dr. Hiren Ambegaokar** CEO, S L Raheja Hospital
- **Nikhil Apte** Chief Product Officer, Royal Sundaram General Insurance Co. Ltd.
- **Mayank Bathwal** CEO, Aditya Birla Health I nsurance Co. Ltd.
- **Subramanyam Brahmajosyula** Head—Underwriting & Reinsurance, SBI General Insurance Co. Ltd.
- **Eswaranatarajan N** Sr. EVP, COO, Kotak Mahindra General Insurance Co. Ltd.
- **Bhaskar Nerurkar** Head Health Administration Team, Bajaj Allianz General Insurance Co. Ltd.
- **Madan Sabnavis** Chief Economist, CARE Ratings Ltd.
- **Dr. Rohit M Sane** MD & CEO, Madhavbaug
- **Dr. Nilesh Shah** Group President, Metropolis Healthcare Ltd.
- **Dr. Sudhakar Shinde** CEO, Mahatma Jyotiba Phule Jan Arogya Yojana (Govt. of Maharashtra)
- **Dr. Pravin Swamy** CEO, Godrej Memorial Hospital
- **Dr. A. Velumani** Founder & CMD, Thyrocare Ltd

**Discussions moderated by R N Bhaskar, Consulting Editor- The Free Press Journal**

**Date:** March 1, 2019 **Time:** 9.15 am onwards

**Venue:** C.K. Nayudu Hall, Cricket Club of India (CCI), Gate No. 4, Dinshaw Vacha Road, Churchgate, Mumbai - 400020

**RSVP:** sachin@fpj.co.in (Please write 'Health Insurance' in the subject line)